**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी ४११ ०१८**

# उत्तरतालिका(Answer key) व हरकत अर्जाबाबत जाहीर निवेदन
## जाहीरात क्रमांक १८४/२०२२

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील गट ब व गट क संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरणेकामी वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिरात क्र.१८४/२०२२ नुसार अर्ज केलेल्या १५ पदांसाठी अर्हताधारक उमेदवारांची ऑनलाईन परिक्षा दिनांक २६/०५/२०२३ ते दिनांक २८/०५/२०२३ या कालावधीत घेण्यात आली होती. या १५ पदांमध्ये लिपिक, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, कनिष्ठ अभियंता,स्थापत्य व कनिष्ठ अभियंता,विद्युत या पदांचा समावेश होता.तथापि दिनांक २८/०५/२०२३ रोजी संघ लोकसेवा आयोगाची पूर्वपरिक्षा असल्याने काही उमेदवारांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची ऑनलाईन परिक्षा देता यावी याकरीता लिपिक, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, कनिष्ठ अभियंता,स्थापत्य व कनिष्ठ अभियंता,विद्युत या पदावरील उमेदवारांची ऑनलाईन परिक्षा ही दिनांक १७/०७/२०२३ रोजी घेण्यात आलेली आहे.

लिपिक, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, कनिष्ठ अभियंता,स्थापत्य व कनिष्ठ अभियंता,विद्युत या ०४ पदांच्या उत्तरतालिकेची लिंक (Answer key) मनपा संकेतस्थळावर भरती या **मेन्यूमध्ये दिनांक २१/०७/२०२३ रोजी सांयकाळी ६.०० वाजलेपासून** उपलब्ध करुन देण्यात येत आहे. उमेदवारांनी वरीलप्रमाणे लिंकवर अर्ज क्रमांक (Application no.) व ऑनलाईन अर्ज भरतेवेळी वापरलेला पासवर्ड (Password) वापरुन उत्तरतालिका (Answer key) तपासून घ्यावी.

उपरोक्तप्रमाणे नमूद ०४ पदांच्या ऑनलाईन परिक्षेचे प्रश्न अथवा उत्तराबाबत उमेदवारांच्या हरकती/आक्षेप असल्यास सदरचे जाहिर निवेदन प्रसिध्द झाल्यापासून ०३ दिवसांत म्हणजेच दिनांक २४/०७/२०२३ रोजी सांयकाळी ६.०० वाजेपर्यंत योग्य त्या कागदपत्रांच्या पुराव्यासह उत्तरतालिकेसोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या हरकत अर्जात पाठविण्यात याव्यात. प्रत्येकी एका हरकत/आक्षेपाकरीता र.रु.२०० शुल्क आहेत. सदरचे शुल्क उमेदवाराने इंटरनेट बँकींग, क्रेडीट कार्ड किंवा डेबीट कार्डद्वारे भरावे.

उमेदवारांना हरकती/आक्षेप घेण्याकामी कोणत्याही अडचणी आल्यास याकरीता त्यांनी ०३ दिवसाचे मुदतीत सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत Helpdesk Email- pcmchelpdesk2022@gmail.com या ई-मेलवर तसेच Hepldesk Number +91 7353293111 या क्रमांकावर संपर्क साधावा.तसेच मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती/आक्षेप यांची दखल घेतली जाणार नाही.याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

क्रमांक - साप्रवि/१/कावि/ ५२३/२०२३
दिनांक २१ /०७/२०२३

# जाहिरात क्र.184/2022

## लिपिक, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, कनिष्ठ अभियंता स्थापत्य व कनिष्ठ अभियंता विद्युत या पदांच्या उत्तरतालिका (Answer Key) व हरकत अर्जाबाबतची लिंक

https://cdn3.digialm.com//EForms/configuredHtml/32281/78492/login.html